# भुयारी मेट्रोची यशस्वी चाचणी

## विद्यानगरी-एमआयडीसी १७ किलोमीटर धावली



मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनने शनिवारी रात्री भुयारी मेट्रो-३ ची यशस्वी चाचणी पूर्ण केली. विद्यानगरी-एमआयडीसी आणि पुन्हा सिप्झ दरम्यान भुयारी मेट्रो धावली. तब्बल १७ किलोमीटरची धाव गाडीने यशस्वीरित्या पूर्ण केल्याने एमएमआरसीएलने समाधान व्यक्त केले आहे.

मुंबईत गेल्या सहा-सात वर्षापासून भुयारी आणि उन्नत मेट्रोची कामे सुरू आहे. त्यामुळे वाहतूकीला मोठया प्रमाणात अडथळा होत आहे. त्यामुळे मेट्रोची कामे कधी पूर्ण होणार असा सवाल सर्वसामान्यांकडून केला जात असताना आता एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. मेट्रो-३ मार्गावर एमआयडीसी ते विद्यानगरी आणि पुन्हा सिप्झ अशी यशस्वी चाचणी एमएमआरसीएलने पूर्ण केली आहे.